## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**जनसंपर्क विभाग**

---

**शहाणा माणूस निर्माण करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश - व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. प्रदीप खेडकर**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशात्र विभागात स्वागत समारोह संपन्न**

अमरावती.

शहाणा माणूस निर्माण करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश असल्याचे प्रतिपादन विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ. प्रदीप खेडकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, संयोजिका डॉ. जागृती बारब्दे व रसायनशास्त्र मंडळाचे अध्यक्ष अनुराज चव्हाण उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रमुख अतिथी प्रा.डॉ. प्रदीप खेडकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कोणत्याही कामाची सुरुवात केल्यास ते कार्य यशस्वीरित्या पाडू शकते. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढलेली असून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सर्वांगीण विकास करण्यासाठी सदैव जागृत रहावे. देशाला बलशाली करण्यासाठी अभ्यासक्रमांची पुनर्रचना, रोजगाराभिमुख व कौशल्याधारित शिक्षण ही त्रिसूत्री महत्वाची आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षणात भावी काळात होणाऱ्या बदलांचे स्वरुप व त्याची तयारी यासह उच्च शिक्षणातील नवीन बदलांचा विद्यार्थ्यांनी स्वीकार करावा, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

अध्यक्षीय भाषणात विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार यांनी सर्वप्रथम विद्यापीठात नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करुन ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण तथा शैक्षणिक विकास महत्वाचा असून तेच विद्यापीठाचे मुख्य ध्येय आहे. विद्यार्थ्यांनी सदैव मिळालेल्या संधीचे सोने करुन त्याचा उपयोग समाजासाठी व पर्यायाने देशासाठी करावा. विद्यार्थीदशेतील जिद्द, चिकाटी आयुष्य घडविणारी असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करुन स्वतःची क्षमता ओळखावी, असेही ते म्हणाले.

संयोजिका डॉ. जागृती बारब्दे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन रसायनशास्त्र मंडळामागील भूमिका विषद केली. यावेळी रसायनशास्त्र मंडळाचे अध्यक्ष अनुराज चव्हाण तसेच विद्यार्थीनी कु. सना अहमद हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन धनश्री वाघमारे हिने, तर आभार सायली मोटेवार हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　　　　　　　　दि. १०/०१/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**जनसंपर्क अधिकारी**

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 7